वि.दि.दावा क्र. १५४/२०२३
मंदाबाई ठाकरे वि. रामराव
निशाणी क्र.३०

वादीतर्फे साक्षीदार क्र.१ रंगराव आत्माराम ठाकरे,
मी शपथेवर सांगतो की,

**<u>साक्षीदाराचा प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. पालीवाल उलटतपास –</u>**

माझे शिक्षण आठवी पर्यंत झाले आहे. मी ऐंप्रेस मिल यामध्ये नोकरीला होतो. दाव्यामध्ये माझी मिळकत समाविष्ट नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत रामराव यांच्या मालकीची असल्यामुळे त्याबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. मंदाबाई ठाकरे हया माझ्यासोबत राहतात. मंदाबाई ठाकरे यांची मानसिक स्थिती चांगली असुन त्या बोलु शकतात आणि त्यांना समजु शकते. दावा हा माझ्या पत्नीने दाखल केलेला आहे. त्यावर माझी सही नाही. दावा दाखल करण्याबाबतची माहिती ही मी माझ्या पत्नीला दिली. हे म्हणणे खरे आहे की दावा दाखल करण्याच्या आगोदर मी अथवा माझ्या पत्नीने, दावामिळकती संदर्भात कोणतीही कारवाही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की २०२३ पुर्वी दावामिळकतीबददलची पुर्ण माहिती मला आणि माझ्या पत्नीला होती. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीच्या वाटपाबाबतची देखिल मला माहिती होती. वादी ही पत्नी आहे म्हणुन आणि रामराव हे सासरे आहेत म्हणुन मी साक्ष देत आहे. वादी माझी पत्नी आहे म्हणुन साक्ष देत आहे इतर कोणत्याही अधिकारा अंतर्गत मी साक्ष देत नाही.

उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.04.04 17:42:22 +0530

दिनांक ३.०४.२०२५
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.–II)